POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३४३ ● मुंबई, सोमवार, १४ जूलै २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## “मी फक्त हिंदीत बोलणार”

### म्हणणाऱ्या रिक्षाचालकाला शिवसेना-मनसे कार्यकर्त्यांनी दिला चोप

**■मुंबई । प्रतिनिधी :**

मराठीच्या मुद्द्यावरुन उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि मनसेच्या कार्यकर्त्यांनी विरारमध्ये परप्रांतीय रिक्षाचालकाला बेदम मारहाण केली आहे. काही दिवसांपूर्वी रिक्षाचालकाचा भावेश पडोलिया नावाच्या व्यक्तीशी वाद झाला होता. विशेष म्हणजे भावेश पडोलिया हा स्वतः परप्रांतीय आहे. त्यांच्यातीव वादाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. ज्यानंतर शिवसेना आणि मनसेच्या कार्यकर्त्यांनी त्याला चोप दिला.

व्हिडीओत रिक्षाचालकाला 'मराठीत का बोलत नाही?' असं विचारल्यानंतर 'मी फक्त हिंदीत बोलणार,' असं बोलतान दिसत आहे. भावेश पडोलिया यांच्या दाव्यानुसार, त्यांनी रिक्षाचालकाला सार्वजनिक ठिकाणी मराठीचा वापर का करत नाही अशी विचारणा केली होती. त्यावर रिक्षाचालकाने त्यांना फक्त हिंदी किंवा भोजपुरीत बोलणार असं उत्तर दिलं.

शनिवारी रिक्षाचालकाला शिवसेना (उद्धव ठाकरे) आणि मनसेच्या कार्यकर्त्यांनी विरार रेल्वे स्थानकाबाहेर घेरलं. शिवसेना-मनसे कार्यकर्त्यांनी मारहाण केल्याचा व्हिडीओदेखील समोर आला आहे, ज्यामध्ये त्याला अनेकदा कानाखाली मारली जात असल्याचं दिसत आहे. कानाखाली मारणाऱ्यांमध्ये महिलादेखील होत्या. यानंतर त्याला भावेश पडोलिया, त्यांची बहीण आणि राज्य सरकारची माफी मागण्यास भाग पाडण्यात आलं. मराठी भाषा आणि संस्कृतीचा अपमान केल्याचं सांगत त्याला माफी मागण्यास सांगण्यात आलं.

शिवसेनेचे विरार शहर प्रमुख उदय जाधव यांनी आम्ही त्यांच्याच शैलीत उत्तर दिल्याचं म्हटलं आहे. ‘‘जर कोणी मराठी भाषा, महाराष्ट्र किंवा मराठी लोकांचा अपमान करण्याचं धाडस केलं तर त्यांना खऱ्या शिवसेना शैलीत उत्तर दिलं जाईल. आम्ही गप्प बसणार नाही,’’ असं त्यांनी म्हटलं आहे. ‘‘महाराष्ट्र आणि मराठी माणसांबद्दल वाईट बोलण्याचे धाडस ड्रायव्हरमध्ये होते. त्याला योग्य धडा शिकवण्यात आला. आम्ही त्याला राज्यातील लोकांची आणि ज्यांच्यावर त्याने नाराजी व्यक्त केली आहे त्यांची माफी मागण्यास भाग पाडले,’’ असा इशाराही त्यांनी दिला आहे.



**अद्याप पोलीस तक्रार नाही**

पालघर जिल्हा पोलिसांनी अद्याप अधिकृत गुन्हा दाखल केलेला नाही. “आम्ही व्हायरल व्हिडिओ पाहिला आहे आणि वस्तुस्थिती पडताळत आहोत, परंतु आतापर्यंत दोन्ही पक्षांकडून कोणतीही तक्रार आलेली नाही,” असं पोलिसांनी सांगितल्याचं वृत्त पीटीआयने दिलं आहे.

## संभाजी ब्रिगेडच्या प्रवीण गायकवाडांना काळं फासलं



मिळालेल्या माहितीनुसार प्रवीण गायकवाड हे अक्कलकोट दौऱ्यावर होते. यावेळी ते फत्तेसिंह शिक्षण संस्था आणि सकल मराठा समाजाने आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात आले होते. तिथे येताच काही लोक अचानकपणे त्यांच्याकडे आले आणि जमा होत त्यांनी प्रवीण गायकवाड यांना काळं फासलं. काळं फासणारे लोक हे शिवधर्म फाउंडेशनचे कार्यकर्ते असल्याचं सांगण्यात येत आहे.

**■पुणे । प्रतिनिधी :**

अक्कलकोटमधून मोठी बातमी समोर येत आहे. येथे संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांना काळं फासण्यात आलं आहे. प्रवीण गायकवाड हे अक्कलकोट येथे फत्तेसिंह शिक्षण संस्था आणि सकल मराठा समाजाच्या कार्यक्रमासाठी आले होते. यावेळी ही घटना घडली. शिवधर्म फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनी काळं फासलं असल्याचं बोललं जातंय.

**शिवधर्म फाऊंडेशनचा होता राग**

प्रवीण गायकवाड यांनी आपल्या संघटनेच्या नावामध्ये छत्रपती संभाजी महाराजांचा एकेरी उल्लेख केल्याने शिवधर्म फाऊंडेशन आक्रमक होते. त्याचबरोबर स्वामी समर्थांचा एकेरी उल्लेख करून त्यांचा अवमान केल्याचादेखील राग या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या मनात होता. यापूर्वी शिवधर्म फाउंडेशनने संभाजी ब्रिगेडच्या विरोधात उपोषणदेखील केले होते.

**कशा पद्धतीने फासलं काळं?**

प्रवीण गायकवाड हे संभाजी ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष आहेत. एकूण दोन संभाजी ब्रिगेड आहेत. गायकवाड हे दुसऱ्या संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष आहेत. ते महाराष्ट्रभर दौरे करत असतात. ते आज अक्कलकोटमध्ये एका कार्यक्रमाला आले होते. कार्यक्रमस्थळी दाखल होत असतानाच शिवधर्म फाऊंडेशनचे कार्यकर्ते तेथे जमा झाले आणि गायकवाड यांना काळे फासण्यात आले.

**प्रवीण गायकवाड यांना मारहाण?**

शिवधर्म फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनी काळं फासल्यानंतर प्रवीण गायकवाड हे कारमध्ये जाऊन बसले. पण शिवधर्म फाऊंडेशनचे कार्यकर्ते आक्रमक झाले होते. त्यांनी कारमध्ये घुसून गायकवाड यांना मारहाण केली. त्यानंतर रस्त्यावरही त्यांना मारहाण झाल्याचे समोर आले.

**सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता, पण..**

दरम्यान आज अक्कलकोट मध्ये प्रवीण गायकवाड यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी त्यांना काळं फासण्यात आलं. हे प्रकरण घडल्यानंतर अद्याप प्रवीण गायकवाड यांनी कोणताही प्रतिक्रिया दिलेली नाही. या प्रकरणावर गायकवाड नेमकी काय भूमिका घेणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## महाराष्ट्रात कुठे कसा पाऊस असेल?

**■मुंबई । प्रतिनिधी :**

भारतात यंदा वातावरणात अनेक बदल झालेले पाहायला मिळत आहे. पूर्व मोसमी पावसापासून ते अगदी मोसमी पारवसांपर्यंत वातावरण बदललं आहे. यामुळे पावसाचा अंदाज सांगणे कठीण झाले आहे. असं असताना महाराष्ट्रात गेल्या चार दिवसापासून पावसाचा कहर पाहायला मिळत आहे. महाराष्ट्रातील विदर्भात, नागपूर, नाशिकमध्ये पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, बंगालच्या उपसागारातून येणारे चक्रीवादळ महाराष्ट्रात पोहोचले आहे. झारखंड, छत्तीसगड मार्गे महाराष्ट्रात हे चक्रवाती वादळ पोहोचले आहे. या वादळाचा फटका महाराष्ट्राला पडला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अरबी समुद्रातून ६५ किमी वेगाने वारे वाहत आहेत. त्यामुळे हवामानात अनेक बदल पाहायला मिळ आहेत. येत्या २४ तासांत अनेक राज्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. १३ जुलै रोजी रत्नागिरी, सातरा व नाशिक घाटपरिसर, धुळे, नंदूरबार या जिल्हयांना यलो अलर्ट, पुण्यासह नगर, पालघर, संभाजीनगर, जालना व जळगाव जिल्हयात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाची शक्ता आहे. तर १४ जुलै रोजी तळकोकणासह किनारपटटी भागात पावसाचे यलो अलर्ट- यात रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हयांसह पुणे, सातारा व कोल्हापूरच्या घाटमाथ्यालाही यलो अलर्ट आहे. राज्यात पुढील दोन दिवस मुसळधार पावसाची शक्यता आहे. विदर्भ, उत्तर महाराष्ट्रात सरासरीहून अधिक पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. राज्यात पुढील दोन दिवस मुसळधार पावसाची शक्यता असून विदर्भ, उत्तर महाराष्ट्रात सरासरीहून अधिक पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. कोकण, मराठवाड्यातही जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. ७ ऑगस्टपर्यंत बुहतांश भागात पावसाची स्थिती सामान्य आहे.

## ही तर शिक्षाच... दारुवरील करवाढीविरोधात आंदोलन

### एचआरएडब्ल्यूआयकडून महाराष्ट्रात १४ जुलैला बार अन रेस्टॉरंट बंद



**राज्यात ३२८ नव्या वाइन शॉपना परवानगी**

गेली ५० वर्षे वाइन शॉप परवान्यांना राज्यात असलेली स्थगिती महसुलात वाढ करण्याच्या उद्देशाने उठवली जाणार असून, नव्याने ३२८ वाइन शॉपना परवाने दिले जाणार आहेत. महसूल वाढवण्याच्या धोरणाचा भाग म्हणून उत्पादन शुल्क विभागाच्या प्रत्येक प्रशासकीय विभागांमध्ये विदेशी मद्यनिर्मिती कंपन्यांना परवाना देण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालीच समिती नेमण्यात आली आहे. मात्र, यामध्ये वादाची ठिणगीही पडली आहे. अजित पवार यांचे निकटवर्तीय व्यक्ती या व्यवसायाशी संबंधित असल्याच्या पार्श्वभूमीवर, हितसंबंधाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. स्वतःच्या प्रभावाखाली असलेल्या व्यक्तींना याचा फायदा मिळण्याची शक्यता असल्यामुळे काही सामाजिक संघटनांनी या नियुक्तीवर आक्षेप घेतला आहे.

**■मुंबई । प्रतिनिधी :**

हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन (वेस्टर्न इंडिया)-एचआरएडब्ल्यूआय ने महाराष्ट्रभर १४ जुलै २०२५ (सोमवार) रोजी आयोजित करण्यात आलेल्या शांततामय आंदोलनाला पूर्ण पाठिंबा जाहीर केला आहे. हे आंदोलन उत्पादन शुल्कात केलेल्या तब्बल ६० टक्क्यांच्या वाढीविरोधात तसेच इंडियन मेड फॉरेन लिकर च्या FL3 आउटलेट्सवरील विक्रीवर १० टक्के लावणे आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी वार्षिक परवाना शुल्कात 15 टक्क्यांनी वाढ करण्याच्या निर्णयाविरोधात आहे. निर्णयाविरोधात एक प्रतीकात्मक विरोध नोंदवण्यासाठी म्हणून एचआरएडब्ल्यूआयने महाराष्ट्रातील आपल्या सर्व सदस्यांना त्या दिवशी बार बंद ठेवण्याचे आणि रेस्टॉरंट्समध्ये मद्यसेवा स्थगित करण्याचे आवाहन केले आहे. एचआरएडब्ल्यूआयचे अध्यक्ष जिम्मी शॉ म्हणाले, ‰महाराष्ट्रातील हॉस्पिटॅलिटी क्षेत्र आधीच अनेक ऑपरेशनल व नियमधारित अडचणींना सामोरे जात आहे. उत्पादन शुल्कात ६०% वाढ, FL3 विक्रीवर १०% VAT आणि परवाना शुल्कात १५% वाढ ही फक्त अनुचित नाही, तर शिक्षेसमान आहे. हा बंद म्हणजे आमचा ‘सामूहिक आक्रोश’ आहे. सरकारने हा निर्णय पुन्हा विचारात घ्यावा आणि आर्थिक स्थैर्य, रोजगार आणि व्यवसायसुलभता यांचा विचार करून योग्य पावले उचलावीत, अशी आम्ही मागणी करतो.‰ या आंदोलनाला महाराष्ट्रातील प्रमुख हॉटेल व रेस्टॉरंट असोसिएशन्सकडून एकमुखी पाठिंबा मिळाला आहे. महाराष्ट्र सरकारकडून हॉस्पिटॅलिटी क्षेत्रावर लादण्यात आलेल्या सातत्यपूर्ण आणि अन्यायकारक करवाढीचा तीव्र निषेध करण्यात येत आहे. राज्याच्या ₹.१.५ लाख कोटींच्या हॉस्पिटॅलिटी उद्योगावर याचा थेट परिणाम होणार आहे. शॉ पुढे म्हणाले, ‘‘महाराष्ट्रभरातील आमचे सर्व सहकारी सदस्य या प्रतिगामी धोरणात्मक निर्णयांविरोधात एकत्र उभे आहेत. एचआरएडब्ल्यूआय संवादातून तोडगा काढण्याच्या भूमिकेस कटिबद्ध आहे आणि आम्ही सरकारला विनंती करतो की त्यांनी उद्योग क्षेत्रातील भागधारकांशी संवाद साधून न्याय व व्यावहारीक तोडगा काढावा.’’




## ५०० कोटींच्या घोटाळ्याचा आरोप...

### सीएम फडणवीसांकडून चौकशीचे आदेश

**■अहिल्यानगर । प्रतिनिधी :**

हल्ली माणसांची काय अहो देवाचीही फसवणूक केली जाते. शनिशिंगणापूर देवस्थानचंच पाहा, तिथे कोट्यवधी रूपयांचा भ्रष्टाचार करून अनेकांनी मोठी माया गोळा केली आहे. देवस्थानावर झालेल्या चौफेर टीकेनंतर मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालून देवस्थान मंडळावर कारवाईचे आदेश दिलेत. पाहुयात हा रिपोर्ट.

शनिशिंगणापुरात अनेक भाविक येतात आणि साडेसाती असो नसो तुझी कृपा राहो, अशी प्रार्थना करतात. मात्र याच देवस्थानाला भ्रष्टाचाराची साडेसाती लागली आहे. भाविकांची देवाच्या नावे कोट्यवधी रूपयांची फसवणूक झालीय. ऑनलाइन पद्धतीनं पूजा, बनावट ॲप, क्युआर कोड, बोगस कर्मचारी असा मिळून तब्बल ५०० कोटींचा घोटाळा केल्याचे गंभीर आरोप भाजप नेते ऋषिकेश शेटेंनी केले आहेत. शनिशिंगणापूर देवस्थान भ्रष्टाचाराचा मुद्दा विधानसभेतही गाजला.

यावर विश्वस्थ मंडळ बरखास्त केलं जाईल, देवाच्या नावानं भ्रष्टाचार करणा-यांना सोडणार नाही, असा इशारा मुख्यमंत्र्यांनी दिला आहे. दरम्यान, माजी मंत्री शंकरराव गडाखांच्या अधिपत्याखाली शनी मंदिर ट्रस्ट सुरू होतं त्यामुळे भ्रष्टाचाराची उत्तर त्यांनाच द्यावी लागतील, असा निशाणा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटलांनी साधला आहे. आरोप झाल्यावर गडाखांनीही आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

कायद्याचा धाक काही जणांना नसतो हे अनेकदा पाहिलंय पण आता देवाच्या दारातही लोक भ्रष्टाचार करतात, देवाचाही धाक अशांना उरलेला नाही, हेच यातून समोर आलंय.

**काय म्हणाले न्यायालय?**

“पीडिता, अल्पवयीन असल्याने, स्वतःचा बचाव करण्याच्या स्थितीत नसावी. यापूर्वी झालेल्या लैंगिक अत्याचारातूनही आघात झाला होता. शेवटचे पण महत्त्वाचे म्हणजे, एका बहिणीने तिच्या सख्ख्या भावाविरुद्ध खोटी साक्ष देण्याचे कोणतेही कारण नाही, तेही इतके गंभीर आरोप लावून,” असे न्यायालयाने म्हटले आहे. आरोपी डोंबिवली येथे राहतो आणि तो एक मजूर आहे. त्याने आपल्या सख्ख्या लहान बहिणीवर बलात्कार केला, त्यावेळी ती फक्त १५ वर्षांची होती. न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवून १० वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. न्यायालयाने आरोपीला ५ हजार रुपयांचा दंड ठोठावला असून तो दंड पीडितेला नुकसान भरपाई म्हणून देण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयाने आरोपीच्या कृत्याची गंभीर दखल घेतली असून त्याला कठोर शिक्षा सुनावली आहे. या घटनेमुळे समाजात खळबळ उडाली असून महिला सुरक्षा आणि लैंगिक अत्याचाराच्या विरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास पूर्ण करून न्यायालयात आरोपपत्र दाखल केले होते. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकून आरोपीला दोषी ठरवले. याप्रकरणी पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी विशेष सरकारी वकिलांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. या निकालामुळे पीडितेला दिलासा मिळाला असून न्यायव्यवस्थेवरील तिचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. अशा घटना समाजात घडू नयेत यासाठी जनजागृती करणे आवश्यक आहे, असे मत व्यक्त केले जात आहे. महिला व बाल विकास विभागाने पीडितेला आवश्यक ते सहकार्य करावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे. आरोपीच्या कुटुंबीयांनी या निकालावर नाराजी व्यक्त केली आहे.मात्र, न्यायालयाने कायद्यानुसार योग्य निर्णय दिला असल्याचे मत काही कायदेतज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. या प्रकरणातील निकाल हा समाजासाठी एक संदेश आहे की, लैंगिक अत्याचार करणाऱ्यांना कठोर शिक्षा दिली जाईल. न्यायालयाच्या या निर्णयामुळे महिला सुरक्षा अधिक मजबूत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## डोंबिवलीत सख्ख्या बहिणीवर मोठ्या भावाचा अत्याचार

**■ठाणे । प्रतिनिधी :**

ठाणे जिल्ह्यातील कल्याण न्यायालयाने एका व्यक्तीला त्याच्या १५ वर्षीय बहिणीवर अनेकवेळा बलात्कार केल्याच्या आरोपाखाली १० वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधीश पी. आर. अष्टुरकर यांच्या न्यायालयाने ३२ वर्षीय आरोपीला भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६(२) (बलात्कार) आणि ५०६(२) (गुन्हेगारी धमकी) अंतर्गत दोषी ठरवले. ही घटना २०१५ मध्ये घडली होती.

कल्याण कोटार्चे अतिरिक्त सत्र न्यायाधीश पी. आर. अष्टुरकर यांनी २ जुलै रोजी हा निकाल दिला, ज्याची प्रत शुक्रवारी उपलब्ध झाली. न्यायालयाने आरोपीला ५,००० रुपयांचा दंडही ठोठावला असून तो दंड पीडितेला भरपाई म्हणून देण्याचे आदेश दिले आहेत. विशेष सरकारी वकील कादंबिनी खंडागळे यांनी न्यायालयाला सांगितले की, डोंबिवलीतील एका कामगाराने ऑगस्ट आणि सप्टेंबर २० मध्ये त्याच्या अल्पवयीन बहिणीवर दोनदा लैंगिक अत्याचार केला.

पीडित मुलगी आरोपी आणि तिच्या इतर भावासोबत भाड्याच्या घरात राहत होती. दुसऱ्या अत्याचारानंतर, पीडितेने एका मैत्रिणीची मदत मागितली, जीच्या पालकांनी तिला पोलिस तक्रार दाखल करण्यास मदत केली. ज्यामुळे २२ सप्टेंबर, २०१५ रोजी एफआयआर नोंदवण्यात आली. न्यायाधीश अष्टुरकर यांनी बचावाचा युक्तिवाद फेटाळून लावला की मुलीने अत्याचाराबद्दल खोटी कथा रचली आहे आणि निदर्शनास आणून दिले की वैद्यकीय पुरावे लैंगिक अत्याचार दर्शवतात आणि मुलीच्या तोंडी साक्षीतून निष्कर्षांची खात्री होते.



## पोलिस कर्मचाऱ्याच्या पत्नीसोबत अधिकाऱ्याकडून वाईट कृत्य

**■नागपूर । प्रतिनिधी :**

पोलिस अधिकाऱ्याने मित्र असलेल्या पोलिस कर्मचाऱ्याच्या पत्नीवर बलात्कार केला. ही खळबळजनक घटना कोंढाळी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वाघविला रिसॉर्ट येथे घडली. याप्रकरणी पोलिसांनी पोलिस उपनिरीक्षकाविरुद्ध बलात्कार, अ‍ॅट्रॉसिटीसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला.




प्राप्त माहितीनुसार, महिलेचा पती २०१०मध्ये गडचिरोली पोलिस दलात दाखल झाला. दीपकही येथे शिपाई होता. महिलेचा पती व दीपक हे बालमित्र असल्याने दोघांची ओळख आहे. दरम्यान, २०१७मध्ये दीपक विभागीय परीक्षेंतर्गत उपनिरीक्षक झाला. सध्या तो विक्रोळी पोलिस ठाण्यात कार्यरत आहे.

दीपक नीलकंठराव अंकुरकर (रा. विरार पोलिस शासकीय वसाहत, मुंबई) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे नाव आहे. नागपुरात राहणाऱ्या ३३वर्षीय महिलेच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला.

जानेवारीत दीपक, त्याचे कुटुंब, महिला व तिचे कुटुंब तसेच अन्य मित्रांनी गोव्याला जाण्याची योजना आखली. यासाठी दीपकने व्हॉट्सॲप ग्रुपही तयार केला. ५ ते १२ जानेवारीदरम्यान सर्वजण गोव्याला गेले. यावेळी दीपकने महिलेशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर तो तिला सतत मेसेज करायला लागला.

फेब्रुवारीत मित्राच्या मुलाच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमासाठी दीपक कुटुंबासह नागपुरात आला. कार्यक्रमानंतर दीपक व त्याच्या अन्य तीन मित्रांचे कुटुंब वाघविला येथे गेले. १५ फेब्रुवारीला महिला खोलीत एकटी होती. दीपक खोलीत गेला व तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर दीपक महिलेला शरीरसुखाची मागणी करायला लागला, असे महिलेचे म्हणणे आहे. तिने पतीला याबाबत सांगितले. पतीच्या मदतीने तिने कोंढाळी पोलिसांत तक्रार दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल केला. दीपकच्या अटकेसाठी कोंढाळी पोलिसांचे पथक मुंबईत तळ ठोकून आहे.

## महिलेने तब्बल ५५ लाखांना गंड घातल्याने कृषी अधिकाऱ्याने जीवन संपवले



गेल्या काही दिवसांपासून आत्महत्येच्या घटनांमध्ये वाढ होते आहे. यात अगदी लहान मुलांपासून तरुणांचाही मोठा सहभाग बघायला मिळत असून ही चिंतेची बाब ठरते आहे. अशा पद्धतीचे अनेक रुग्ण हे आमच्याकडे येत आहे आर्थिक फसवणुकीच्या कारणावरून टोकाचे पाऊल उचललं जातं यामुळे आर्थिक फसवणूक झालेल्यांनी कुटुंबातील पत्नी भाऊ किंवा मित्राशी मन मोकळे पद्धतीने बोलणे गरजेचे आहे. या मानसिक तणावातून बाहेर पडण्यास यातून मदत होते त्याचबरोबर ऑनलाईन आलेली रिक्वेस्ट फेसबुक इंस्टाग्राम अन्य सोशल मीडियातून तर ती स्वीकारू नये अशा पद्धतीचा आवाहन देखील मानसोपचार तज्ज्ञांकडून करण्यात आला आहे. तुमची वैयक्तिक माहिती, ओटीपी कुणालाही शेअर करू नका.. सायबर गुन्हेगारांनी दिलेल्या कोणत्याही आमिषाला किंवा धमकीला बळी पडू नका असं वारंवार आवाहन पोलिसांकडून केले जाते. मात्र, तरी देखील सायबर गुन्हेगारीमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे बघायला मिळत असून ही गुन्हेगारी रोखण्याचे मोठं आव्हान पोलिसांसमोर सध्या निर्माण झाले.

**■पालघर । प्रतिनिधी :**

सायबर गुन्हेगारीचे रोज अनेक नवनविन प्रकार समोर येत असतांनाच नाशिकमध्ये एक धक्कादायक घटना समोर आली आहे. अनोळखी फेसबुक फ्रेंड महिलेने तब्बल ५५ लाख रुपयांना गंडा घातल्याने एका कृषी अधिकाऱ्याने विषारी औषध सेवन करत आपले जीवन संपवले आहे. या घटनेमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून अधिकाऱ्याच्या पत्नीने दिलेल्या तक्रारीनूसार पोलीसांनी गुन्हा दाखल करत तपासाला सुरुवात केली आहे.


सायबर गुन्हेगारीने सध्या चांगलच डोकं वर काढलय, काही ना काही नवनविन शक्कल लढवत सायबर गुन्हेगार नागरिकांना सहजपणे आपल्या जाळ्यात ओढतायत आणि अशाचप्रकारे सायबर गुन्हेगारांनी दाखवलेल्या आमिषाला बळी पडत जवळपास ५६ लाखांची फसवणूक झाल्याने पालघर जिल्ह्यातील जव्हार पंचायत समितीत कृषी अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या प्रशांत पाटील यांनी ६ जून २०२५ रोजी आत्महत्या करत आपले जीवन संपवले आहे.

प्रशांत पाटील यांची फेसबुकवर एका अनोळखी महिलेसोबत मैत्री झाली होती, या महिलेने हापको ऑइलच्या व्यवसायाचे पाटील यांना आमिष दाखवले होते. आमच्याकडून ऑइलची स्वस्तात खरेदी करून त्याची विक्री केल्यास भरघोस नफा मिळेल असे त्यांना सांगण्यात आले होते. सुरुवातीला त्यांना या महिलेकडून ऑईल मिळाले देखील होते.


फेसबुक फ्रेंडने प्रशांत पाटील यांना जवळपास ५५ लाख ७९ हजार ३०० रुपये रक्कम विविध बँक अकाउंटमध्ये भरण्यास भाग पाडले होते. त्यासाठी त्यांनी बायकोचे ३० तोळे सोन्याच्या दागिन्याची देखिल विक्री केली होती. आपल्या मित्रांकडून देखील त्यांनी पैसे गोळा केले होते. मात्र, त्यानंतर ऑइल मिळाले नाही यासोबतच कजार्ची परतफेड कशी करायची ही चिंता त्यांना लागली होती आणि याच सर्व ताणतणावातून त्यांनी टोकाचे पाऊल उचलले.

बायको आणि सहावीत शिकणाऱ्या आपल्या मुलीसह पाटील सिडको परिसरात असलेल्या मातोश्री या अपार्टमेंट वास्तव्यास होते. मात्र, प्रशांत पाटील यांनी या जगाचा निरोप घेतला आणि त्यांच्या पत्नीने देखिल हे घर सोडलं. दरम्यान याबाबत अंबड पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पत्नीच्या तक्रारीनंतर सायबर पोलिसात फसवणुकीचा गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. प्रशांत पाटील यांच्यासह अनेकांची अशाप्रकारे ऑईल व्यवसायाच्या नावाखाली फसवणूक झाल्याची शक्यता आहे.


# जागतिक वारसा लाभलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले





प्रतापगड हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील एक किल्ला सातारा वाहनतळावरून गडाच्या दक्षिणेच्या टेहळणी बुरूजाखालून सरळ जाणाऱ्या पायवाटेने आपण थोड्या वेळातच तटबंदीत लपविलेल्या पश्चिमाभिमुख महादरवाज्यात येऊन पोहोचतो. वैशिष्ट्य म्हणजे शिवकालीन रितीप्रमाणे आजही हा दरवाजा सूर्यास्तानंतर बंद ठेवला जातो व सूर्योदयापूर्वी उघडला जातो. महादरवाज्यातून आत गेले की उजव्या हातालाच चिलखती बांधणीचा बुरूज दिसतो. हा बुरूज पाहून परत पायऱ्यांच्या मार्गाने भवानी मंदिराकडे जाता येते. मंदिरात भवानीमातेची सालंकृत प्रसन्न मूर्ती आहे. ही मूर्ती महाराजांनी नेपाळमधील गंडकी नदीतून शाळिग्राम शिळा आणून त्यातून घडवून घेतली. या मूर्तीशेजारीच छत्रपती शिवाजी महाराजांच्या नित्य पूजेतील स्फटिकाचे शिवलिंग व सरसेनापती हंबीरराव मोहिते यांची तलवार आहे.



युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत मान्यता मिळण्यासाठी भारत सरकारकडून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळातील १२ किल्ल्यांचं नामांकन पाठवण्यात आलं होतं. या किल्ल्यांचा वारसा यादीत समावेश झाल्याची घोषणा झाली आहे. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगडचा समावेश आहे. याशिवाय साल्हेर किल्ला, शिवनेरी किल्ला, लोहगड, खांदेरी किल्ला, राजगड, प्रतापगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळा किल्ला, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग आणि तामिळनाडूतील जिंजीचा किल्ला यांचा समावेश आहे.




कोल्हापुराच्या मुख्य शहरापासून २० किलोमीटर अंतरावर, वायव्य दिशेला वसलेला पन्हाळा किल्ला आपल्या भव्यतेमुळे देशातील सर्वात मोठ्या किल्ल्यांपैकी एक आहे. देकनमधील सर्वात मोठा किल्ला म्हणूनही तो ओळखला जातो. इतिहासप्रेमींसाठीच नव्हे तर ट्रेकिंग करण्याची आवड असणाऱ्यांसाठीही हा किल्ला नक्कीच आकर्षणाचा केंद्रबिंदू आहे. पन्हाळा किल्ला हा एका महत्त्वाच्या व्यापारी मार्गावर वसलेला आहे, जो महाराष्ट्रातील बीजापूरपासून अरबी समुद्राच्या किनारपट्ट्यापर्यंत जातो. सह्याद्रीच्या हिरव्यागार डोंगरांच्या कुशीत विसावलेला हा किल्ला सुमारे ७ किलोमीटर लांब आहे. तीन भव्य दुहेरी तटबंदीवरतील मजबूत दरवाजे त्याचे रक्षण करतात. किल्ल्याच्या संपूर्ण लांबीवर कंगरे, तटबंदी आणि बुरुज आहेत, ज्यात मराठा, आदिलशाही, मुघल इत्यादी विविध राजवंशांच्या वास्तुकलेचे नमुने दिसतात.





किल्ले रायगड हा महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील सह्याद्रीच्या पर्वतरांगांत असून समुद्रसपाटीपासून सुमारे ८२० मीटर (२७०० फूट) उंचीवर आहे. मराठी साम्राज्याच्या इतिहासामध्ये त्याची एक खास ओळख आहे. छत्रपती शिवाजीराजांनी रायगडचे स्थान आणि महत्त्व पाहून १६ व्या शतकात याला आपल्या राज्याची राजधानी बनविली. शिवराज्याभिषेक याच ठिकाणी झाला. इंग्रजांनी गड कब्जात घेतल्यानंतर लुटून त्याची नासधूस केली. सदर किल्ला हा महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व विभागाचे संरक्षित स्मारक आहे.

ह्याचे प्राचीन नाव 'रायरी' हे होते. युरोपचे लोक त्यास 'पूर्वेकडील जिब्राल्टर' असे म्हणत असत. जिब्राल्टरचे ठाणे जितके अजिंक्य तितकाच रायगड अजिंक्य व दुर्गम. पाचशे वर्षांपूर्वी त्यास गडाचे स्वरूप नव्हते व तो नुसता एक डोंगर होता, तेव्हा त्यास 'रासिवटा' व 'तणस' अशी दोन नावे होती. त्याचा आकार, उंची व सभोवतालच्या दऱ्या यावरून त्यास 'नंदादीप' असेही नाव पडले. निजामशाहीत रायगडाचा उपयोग कैदी ठेवण्यापुरता होई. मोऱ्यांचा प्रमुख यशवंतराव मोरे जावळीहून पळून रायगडावर जाऊन राहिला तर प्रतापराव मोरे विजापुरास पळाला. महाराजांनी ६ एप्रिल १६५६ रोजी रायरीस म्हणजेच रायगडास वेढा घातला व मे महिन्यात रायरी महाराजांच्या ताब्यात आली. तेथे असताना, कल्याणचा सुभेदार मुल्ला अहमद खजिना घेऊन विजापूरकडे निघाल्याची बातमी महाराजांना समजली. त्यांनी तो खजिना लुटून रायगडावर आणला व त्या खजिन्याचा उपयोग गडाच्या बांधकामासाठी केला. रायगडाचा माथा राजधानी बनवण्यास सोयीचा व पुरेसा आहे. शत्रूला अवघड वाटणाऱ्या प्रदेशातले ते अधिक अवघड ठिकाण आहे. सागरी दळणवळणासही हे ठिकाण जवळ आहे. म्हणून महाराजांनी राजधानीसाठी या गडाची निवड केली. रायगड किल्ल्याचे पूर्वीचे नाव जम्बुद्वीप असे होते. शिवराज्याभिषेक हा रायगडाने अनुभवलेला सर्वश्रेष्ठ प्रसंग आहे. महाराजांचा राज्याभिषेक म्हणजे, महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासातील एक लक्षणीय घटना आहे. १९ मे १६७४ रोजी राज्याभिषेकाच्या विधी पूर्वी महाराजांनी प्रतापगडाच्या भवानीचे दर्शन घेतले. तीन मण सोन्याचे म्हणजेच ५६ हजार किंमतीचे छत्र देवीला अर्पण केले. गडावरील राज सभेत ६ जून १६७४, ज्येष्ठ शुद्ध १३ शके १५९६, शनिवार या दिवशी राज्याभिषेक साजरा झाला. २४ सप्टेंबर १६७४, ललिता पंचमी आश्विन शुद्ध ५, आनंद संवत्सर शके १५९६ या दिवशी तांत्रिक पद्धतीने राजांनी स्वतःला आणखी एक राज्याभिषेक करून घेतला. या मागचा खरा हेतू हा जास्तीत जास्त लोकांना समाधान वाटावे हा होता. हा राज्याभिषेक निश्चलपुरी गोसावी याच्या हस्ते पार पडला.





सिंधुदुर्ग हा महाराष्ट्राच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अरबी समुद्रात छत्रपतीशिवाजी महाराजांनी बांधलेलाजलदुर्ग आहे. नोव्हेंबर २५, इ.स. १६६४ रोजी किल्ल्याच्या बांधकामाला सुरुवात झाली. भारत सरकारने या किल्ल्याला दिनांक २१ जून, इ.स. २०१० रोजी महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित केलेले आहे. शिवाजी महाराजांच्या आरमारात या किल्ल्याला फार महत्त्व होते. किल्ल्याचे क्षेत्र कुरटे बेटावर ४८ एकरावर पसरलेले आहे. तटबंदीची लांबी साधारण तीन किलोमीटर आहे. बुरुजांची संख्या ५२ असून ४५ दगडी जिने आहेत. ह्या किल्ल्यावर शिवाजी महाराजांच्या काळातील गोड्या पाण्याच्या दगडी विहीरी आहेत. त्यांची नावे दूध विहीर, साखर विहीर व दही विहीर अशी आहेत. या किल्ल्याच्या तटबंदीच्या भिंतीमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी त्या काळी तीस ते चाळीस शौचालयाची निर्मिती केली आहे. या किल्ल्यामध्ये शिवाजी महाराजांचे शंकराच्या रूपातील एक मंदिर आहे. हे मंदिर इ.स. १६९५मध्ये शिवाजी महाराजांचे पुत्र छत्रपती राजाराम महाराज यांनी बांधले.




जिंजीचा किल्ला हा भारताच्या तमिळनाडू राज्यातील एक किल्ला आहे. ह्या किल्ल्याला राजगड आणि रायगडनंतर स्वराज्याची तिसरी राजधानी म्हणून ओळखतात. छत्रपती शिवाजी महाराज यांच्यानंतर छत्रपती राजाराम महाराजांनी जिंजीच्या मदतीने हिंदवी स्वराज्याची पुनः प्रतिष्ठापना केली. छत्रपती शिवाजी महाराज दक्षिण दिग्विजय मोहिमेवर असताना त्यांनी जिंजीचा किल्ला जिंकून घेतला.





सुवर्णदुर्ग हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील रत्नागिरी जिल्ह्यातील एक किल्ला आहे. दापोली शहरापासून हर्णे गावातून या किल्ल्यावर जाण्यासाठी जलवाहतूक सुविधा उपलब्ध आहे. हर्णे बंदर प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. सुवर्णदुर्ग या जलदुर्गामुळे हर्णे बंदराला ऐतिहासिक महत्त्वही प्राप्त झालेले आहे. सुवर्णदुर्ग किल्ल्याच्या रक्षणासाठी हर्णेच्या सागरी किनाऱ्यावर तीन किनारी किल्ल्यांची उभारणी करण्यात आलेली आहे. ते तीन दुर्ग म्हणजे कनकदुर्ग, फत्तेदुर्ग आणि गोवागड. भारत सरकारने या किल्ल्याला दिनांक २१ जून, इ.स. १९१० रोजी महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित केलेले आहे.





खांदेरी हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील रायगड जिल्ह्यातील एक किल्ला आहे. खांदेरीचा दुर्ग हा काही फार प्रसिद्ध दुर्ग नव्हे; पण हे बेट मुंबईच्या समोरच असल्याने अतिशय मोक्याचे आहे. इ.स. १६७९ च्या ऑगस्ट महिन्यात शिवाजी महाराजांनी मायनाक भंडाऱ्याला येथे पाठवून बेटावर किल्ला बांधावयास काढला. या बेटावर वेताळाचे एक मोठे राऊळ आहे. त्याची पूजा केल्याशिवाय कोणीही कोळी मासेमारीसाठी नावा समुद्रात घालत नाहीत. बेटावर एक टेकडी आहे आणि बेटालाच तटबंदी घातली आहे. खांदेरी किल्ल्यास भेट देण्यासाठी प्रथम अलिबागला जावे लागते. तेथून थळला जावे. थळच्या किनारपट्टीवर थळचा भग्न किल्ला आहे. तेथून नावेतून या जलदुर्गावर जाता येते.




विजयदुर्ग किंवा घेरिया हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एक किल्ला आहे.१ विजयदुर्ग हा सिंधुदुर्ग जिल्ह्यात असलेला एक जलदुर्ग आहे. हा किल्ला मुंबईच्या दक्षिणेस सुमारे २२५ किलोमीटरवर व गोव्याच्या उत्तरेस १५० किलोमीटरवर आहे. सुमारे १७ एकर जागेत हा किल्ला पसरला आहे. या किल्ल्यास तीन तटबंदी आहेत. त्यास चिलखती तटबंदी असे म्हणतात. याच्या तीन बाजू पाण्याने घेरलेल्या आहेत. या किल्ल्यात दोन भुयारी मार्ग आहेत. एक किल्ल्याच्या पूर्वेकडे तर दुसरा पश्चिमेकडे. विजयदुर्ग हा किल्ला ११ व्या शतकाच्या अखेरीस शिलाहार घराण्यातील राजा भोजने बांधला.





लोहगड हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील एक किल्ला आहे. भारत सरकारने या किल्ल्याला दिनांक २६ मे, इ. स. १९०९ रोजी महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित केलेले आहे. लोणावळ्यानजीकच्या मळवली स्टेशन नजीकच दुर्गांची एक जोडगोळी उभी आहे. त्यातील मुख्य दुर्ग आहे लोहगड आणि त्याला बळकट आणि संरक्षित करण्यासाठी शेजारीच बांधला आहे विसापूर अथवा संबळगड. लोहगडावरून पवनेच्या धरणाचे सुंदर दृश्य दिसते. पलीकडेच तिकोना उर्फ वितंडगड नावाचा अजून एक किल्ला आहे. तुंग उर्फ कठीणगडही येथेच आहे. नाणे मावळ आणि पवन मावळ यांच्यामधील पर्वतराजीत हा दुर्ग वसलेला आहे.




शिवनेरी किल्ला हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील एक किल्ला आहे. शिवनेरीचा हा प्राचीन किल्ला महाराष्ट्र राज्यात जुन्नर शहराजवळ, पुण्यापासून १०५ किलोमीटरवर आहे. भारत सरकारने या किल्ल्याला दिनांक २६ मे, इ.स. १९०९ रोजी महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित केलेले आहे. १९ फेब्रुवारी १६३० रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म शिवनेरी गडावर झाला होता. हा किल्ला खूप प्रसिद्ध आहे. या किल्ल्याला चारही बाजूंनी कठीण चढाव असून त्याला जिंकावयास कठीण असा बालेकिल्ला आहे. किल्ल्यावर शिवाई देवीचे छोटे मंदिर व जिजाबाई व बाल-शिवाजी यांच्या प्रतिमा आहेत. या किल्ल्याचा आकार शंकराच्या पिंडीसारखा आहे. शिवनेरी अगदी जुन्नर शहरात आहे. जुन्नरमधे शिरतानाच शिवनेरीचे दर्शन होते. किल्ला तसा फार मोठा नाही. १६७३ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीतील डॉ. जॉन फ्रायर याने या किल्ल्याला भेट दिली होती. त्याने आपल्या साधनग्रंथात, या किल्ल्यावर हजार कुटुंबांना सात वर्षे पुरेल एवढी शिधासामुग्री आहे असा उल्लेख केला आहे.




राजगड हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील एक किल्ला आहे. राजगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याची पहिली राजधानी होती. पुणे शहराच्या नैऋत्येला ४८ कि.मी. अंतरावर आणि पुणे जिल्ह्यातील, वेल्हे तालुक्यात व भोर गावाच्या वायव्येला २४ कि.मी. अंतरावर नीरा-वेळवंडी-कानंदी आणि गुंजवणी या नद्यांच्या खोऱ्यांच्या बेचक्यात मुरुंबदेवाचा डोंगर उभा आहे. मावळ भागामध्ये राज्यविस्तार साध्य करण्यासाठी राजगड आणि तोरणा हे दोन्ही किल्ले मोक्याच्या ठिकाणी होते. तोरणा किल्ल्याचा बालेकिल्ला आकाराने लहान असल्यामुळे राजकीय केंद्र म्हणून हा किल्ला सोयीचा नव्हता. त्यामानाने राजगड दुर्गम असून त्याचा बालेकिल्ला बराच मोठा आहे. शिवाय राजगडाकडे कोणत्याही बाजूने येताना एखादी टेकडी किंवा नदी ओलांडावीच लागते. एवढी सुरक्षितता होती, म्हणून आपले राजकीय केंद्र म्हणून शिवाजी महाराजांनी राजगडाची निवड केली. राजगडाला तीन माच्या व एक बालेकिल्ला आहे. राजगडचा बालेकिल्ला खूप उंच असून त्याची समुद्रसपाटीपासूनची उंची १३९४ मीटर आहे. दुर्गराज राजगड त्यांच्या महत्त्वाकांक्षेची उंची दाखवतो, तर किल्ले रायगड हा शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाचा विस्तार दाखवतो. राजगडाच्या मध्यवर्ती ठिकाणी उंच डोंगर तासून तयार केलेला बालेकिल्ला म्हणजे पृथ्वीने स्वर्गावर केलेली स्वारी होय.




साल्हेर हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील एक किल्ला आहे. साल्हेर-मुल्हेर या जोडीतला हा साल्हेरचा किल्ला असून सह्याद्री पर्वतरांगेतील महाराष्ट्रातील सर्वात उंच किल्ला आहे. हा किल्ला नाशिक जिल्ह्यात आहे. नाशिक जिल्हा हा महाराष्ट्रातील गिरिदुर्गांच्या बाबतीत अतिशय संपन्न आहे. नाशिक जिल्ह्यामध्ये ५७ गिरिदुर्ग आहेत.

या गिरिदुर्गामध्ये महाराष्ट्रातील सर्वात उंच असा साल्हेरचा किल्ला येतो. नाशिक जिल्ह्याच्या उत्तरेकडील भागामध्ये बागलाण हा प्रांत आहे. तो सध्या सटाणा या तालुक्यामध्ये समाविष्ट झालेला आहे. नाशिक जिल्ह्यामधील सर्वांत जास्त किल्ले सटाणा तालुक्यातच आहेत. साल्हेरचे युद्ध इ.सन १६७१-७२ मध्ये शिवाजी महाराजांनी साल्हेरचा दुर्ग जिंकला.

# रॅगिंग रोखण्यासाठी विद्यार्थ्यांची फौज!
## आरोग्य विद्यापीठ देणार विद्यार्थी परिषदेवर जबाबदारी

**■नाशिक :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने वैद्यकीय महाविद्यालयांमधील रॅगिंगचे प्रकार रोखण्यासाठी विशेष पाऊल उचलले आहे.

विद्यापीठाच्या विद्यार्थी परिषदेचे सदस्य व महाविद्यालयातील विद्यार्थी परिषदांचे सदस्य यांच्यावर ही जबाबदारी देण्यात येणार असून, त्या माध्यमातून रॅगिंगला प्रतिबंध करण्याचा प्रयत्न सुरू करण्यात आला आहे. यासाठी शिक्षक-विद्यार्थ्यांचे मानसिक प्रबोधनही विद्यापीठामार्फत केले जात आहे.

रॅगिंग अर्थात विद्यार्थ्यांचा होणारा शारीरिक आणि मानसिक छळ ही महाविद्यालयीन जीवनातील एक मुख्य समस्या आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांमध्ये हा प्रकार अधिक प्रमाणात आढळतो. त्यातल्या त्यात वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ही समस्या भेडसावण्याचे प्रमाण जास्त आहे. गेल्या काही वर्षांत याचे प्रमाण कमी झालेले असले, तरी हा प्रकार अद्याप सुरूच आहे. गेल्या तीन वर्षांत (२०२१ ते २०२४) राज्यभरातील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये रॅगिंगची ५० प्रकरणे पुढे आली. त्यातील ३५ प्रकरणे सरकारी महाविद्यालयांमधील होती. याला आळा घालण्यासाठी आरोग्य विद्यापीठामार्फत विशेष पाऊल उचलण्यात आले असून, विद्यार्थ्यांच्या माध्यमातूनच याची सुरुवात केली जाणार आहे.

याचसोबत शिक्षक आणि शिक्षकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी समुपदेशनाचे आयोजन विद्यापीठामार्फत करण्यात आले आहे. राज्यातील सहापैकी चार विभागांमध्ये या कार्यशाळा झाल्या असून, पुढील महिनाभरात उर्वरित दोन विभागांमध्येही त्या होणार आहेत. त्याचसोबत गेल्या वर्षभरात झालेल्या 'कुलगुरू कट्टा'च्या १० सत्रांमधूनही विद्यार्थ्यांचे थेट समुपदेशन करण्यात आल्या सांगण्यात आले.

### 'त्या' दोषींवर कारवाई

आतापर्यंत गेल्या तीन वर्षांत रॅगिंगची जी प्रकरणे निदर्शनास आली, त्यांच्याबाबत कठोर भूमिका घेण्यात आल्याचे विद्यापीठामार्फत सांगण्यात आले.

तक्रारी दाखल झाल्यानंतर चौकशी करून त्या लगेच मिटविण्यात आल्या आहेत. काही प्रकरणांत दोषींना निलंबित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे काहींना कायमस्वरूपी होस्टेल प्रवेशास बंदीही घालण्यात आली आहे

गेल्या काही वर्षांत रॅगिंगला प्रतिबंध करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या प्रकारांची आणि त्याच्या परिणामांची तीव्रता बऱ्याच प्रमाणात कमी झाली आहे, असे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. मिलिंद निकुंभ यांनी सांगितले.




**अशी असेल प्रक्रिया**

रॅगिंग होत असल्यास महाविद्यालयाच्या विद्यार्थी परिषदेच्या सदस्यांकडे संबंधित विद्यार्थ्यांने तक्रार द्यायची असून, या परिषदेतील सदस्यांनी ही तक्रार विद्यापीठाच्या विद्यार्थी परिषदेकडे नोंदवायची आहे. त्यानंतर विद्यापीठातील विद्यार्थी परिषदेने थेट विद्यार्थी कल्याण संचालकांकडे ही तक्रार नोंदवायची आहे. यामुळे लवकरात लवकर ही तक्रार विद्यापीठाकडे येणार आहे. त्याचे निराकरण करून दोषींवर कारवाई करणे शक्य होणार असल्याचे विद्यापीठामार्फत सांगण्यात आले.

# 'मकोका' कायद्यात सुधारणा
## संघटित गुन्हेगारी टोळ्यांवर कठोर कारवाईचा मार्ग मोकळा

**■जव्हार :** राज्यात वाढत असलेल्या अमली पदार्थांच्या गैरवापरामुळे तरुण पिढीचे आरोग्य आणि समाजव्यवस्थेवर गंभीर परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेत, इमहाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियमश (मकोका) कायद्यात सुधारणा करण्याचे विधेयक विधानसभेत सादर केले आहे. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी हे विधेयक सभागृहात सविस्तरपणे मांडले आणि त्यामागची भूमिका स्पष्ट केली. मकोका कायद्यातील सुधारणा अमली पदार्थांशी संबंधित गुन्ह्यांना इसंघटित गुन्हेगारीश म्हणून परिभाषित करेल. यामुळे ठउद्धर कायद्यातील प्रकरणांवर आता मकोका अंतर्गत कठोर कारवाई शक्य होईल. राज्यात मागील पाच वर्षांत अमली पदार्थ प्रकरणांमध्ये ७३ हजार गुन्हे नोंदवले गेले असून, १० हजार कोटींहून अधिक किमतीचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. या विधेयकामुळे अमली पदार्थांच्या उत्पादन, वाहतूक, वितरण व तस्करीमध्ये सहभागी असलेल्या टोळ्यांवर कठोर प्रतिबंध लावणे शक्य होणार असून, कायद्याची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित होणार आहे. गृहराज्यमंत्री कदम यांनी अधोरेखित केले की, ''युद्धपातळीवर अमली पदार्थांविरोधात कारवाई करण्यासाठी हे विधेयक निर्णायक ठरेल.''




ही केवळ कायद्यातील तांत्रिक सुधारणा नसून, समाजाच्या रक्षणाची आमची जबाबदारी आहे. तरुण पिढी अमली पदार्थांच्या विळख्यात सापडू नये, यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. ही सुधारणा अमली पदार्थांच्या तस्करीसाठी जबाबदार असलेल्या संघटित गुन्हेगारी टोळ्यांवर कठोर कारवाईसाठी मार्ग मोकळा करणार आहे.

## मुंब्रा-शिळ परिसरातील २१ अनधिकृत इमारती जमीनदोस्त
# खान कंपाऊंड आता 'ग्रीन झोन'... हरित क्षेत्रात रूपांतराची महापालिकेची तयारी

**■ठाणे :** मुंब्रा-शिळ परिसरातील खान कंपाऊंडमधील २१ अनधिकृत इमारती उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर ठाणे महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने अखेर जमीनदोस्त केल्या असून, या संपूर्ण क्षेत्राला 'ग्रीन झोन' म्हणून विकसित करण्यास सुरुवात झाली आहे. महापालिकेने येथे वृक्ष लागवड सुरू केली असून, टप्प्याटप्प्याने संपूर्ण परिसर हरित बनवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

गेल्या काही वर्षांपासून खान कंपाऊंड परिसरात झपाट्याने अनधिकृत बांधकामे उभी राहत होती. ठाणे महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने उच्च न्यायालयाच्या आदेशावर आधारित कारवाईस १३ जूनपासून सुरुवात केली. गट क्रमांक १७८, १७९ आणि १८० या भागात उभारलेल्या १७अनधिकृत इमारतींवर पहिल्या टप्प्यात कारवाई करण्यात आली.

या कारवाईदरम्यान काही रहिवाशांनी न्यायालयात धाव घेतली. मात्र, न्यायालयाने कारवाईला स्थगिती देण्यास नकार देत, संबंधित रहिवाशांना २३ जूनपर्यंत जागा रिकामी करण्याची मुदत दिली. मुदत संपल्यानंतर उर्वरित इमारतींवरही कारवाई करण्यात आली.

कारवाईदरम्यान, मूळ आकडेवारीत १७ इमारती असल्याचे नमूद होते. मात्र, प्रत्यक्षात ४ अतिरिक्त अनधिकृत इमारती असल्याचे उघड झाल्याने एकूण २१ इमारती पूर्णपणे पाडण्यात आल्या. ही कारवाई अतिक्रमण विभागाचे उपायुक्त शंकर पाटोळे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस महापालिकेच्या बंदोबस्ताच्या सहाय्याने राबवण्यात आली. माहितीनुसार, या संपूर्ण क्षेत्राची पूर्वीची स्थिती 'हरित क्षेत्र' म्हणजेच ग्रीन झोन म्हणून नोंदवलेली होती.

त्यामुळेच या जागेवर अनधिकृत बांधकामे केल्याने ती नियमबाह्य ठरत होती. आता या जागेचा मूळ उपयोग टिकवून ठेवत महापालिकेने येथे वृक्ष लागवड करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या पाडलेल्या एका इमारतीच्या जागेवर वृक्षांची लागवड सुरू करण्यात आली असून, टप्प्याटप्प्याने संपूर्ण परिसरात अशाच प्रकारे झाडांची लागवड केली जाणार आहे. त्यामुळे पर्यावरण संवर्धनाबरोबरच नागरिकांना हिरवळयुक्त श्वास घेण्याजोगे वातावरणही मिळणार आहे.



या कारवाईसाठी लागलेला संपूर्ण खर्च संबंधित बांधकामधारकांवर टाकण्यात येणार असून, महापालिकेने त्यांच्याकडून ही रक्कम वसूल करण्याचा निर्णय घेतला आहे. अनधिकृत बांधकामे ही कायद्याविरोधात असल्यामुळे महापालिका आता अशा प्रकरणांमध्ये अधिक कठोर भूमिका घेत असल्याचे संकेत मिळाले आहेत.

### पर्यावरणपूरक पुढाकार

खान कंपाऊंड परिसरात वृक्ष लागवडीत स्थानिक वड, पिंपळ, आंबा, अशोक, गुलमोहर यांसारख्या स्थानिक प्रजातींचा समावेश केला जाणार आहे. यामुळे परिसराचा तापमान नियंत्रित राहण्यास मदत होईल तसेच जैवविविधतेलाही चालना मिळेल.

# बुलढाण्यात गर्भपात करणाऱ्या बोगस डॉक्टरच्या रुग्णालयात वैद्यकीय पथकाचा छापा

**■बुलढाणा :** जिल्ह्याच्या चिखली तालुक्यातील रायपूर येथे एक बोगस डॉक्टरचा पदार्फाश झाला असून आयुर्वेदिक डॉक्टरच्या रुग्णालयात अवैध गर्भपात करत असताना जिल्हा शल्य चिकित्सकांनी छापा मारला. गर्भपातासंदभार्तील कुठलीही परवानगी आणि शैक्षणिक अर्हता नसताना येथील डॉक्टर महोदयांकडून अवैधपणे गर्भपात करण्यात येत होता. यासंदर्भात माहिती मिळाल्यानंतर थेट जिल्हा शल्य चिकित्सकांनीच रुग्णालयात धाड टाकली. त्यानंतर, रायपूर येथील डॉ. उज्वल खंडागळे यांच्या खंडागळे हॉस्पिटल वर जिल्हा शल्य चिकित्सकांची ढउढठउळ कायद्यअंतर्गत मोठी कारवाई केली आहे. या कारवाई दरम्यान भ्रूण अवशेष मिळाल्याची माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.दत्तात्रय बिराजदार यांनी दिली.

बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यातील रायपूर या गावात उज्वल खंडागळे या आयुर्वेदिक डॉक्टरच्या खंडागळे हॉस्पिटल या रुग्णालयावर गोपनीय माहितीच्या आधारे अवैध गर्भपात करत असताना जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार व पथकाने छापा टाकला. यावेळी, सदर डॉक्टरला गर्भपात करताना रंगेहात पकडण्यात आल्याने जिल्ह्याच्या वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे. यावेळी या डॉक्टरकडे कुठलीही गर्भपात करण्याची परवानगी अथवा शैक्षणिक अहर्ता नसल्याचं तपासात आढळून आलं. वैद्यकीय पथकाने पोलिसांच्या मदतीने तपासणी केली असता भ्रूणहत्येचे अनेक अवशेष आणि एक संपूर्ण भ्रूण याठिकाणी सापडलं आहे. त्यामुळे, जिल्हा शल्य चिकित्सकांनी ढउढठउळ कायद्याअंतर्गत कारवाई करत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. विशेष म्हणजे या ठिकाणी करण्यात आलेली कारवाई ही अलीकडच्या काळातील सर्वात मोठी कारवाई मानल्या जात आहे. हा डॉक्टर किती वर्षापासून भ्रूणहत्या, अवैधपणे गर्भपात करत होता? याची चौकशी आता पथक व पोलीस करत आहेत. त्यानंतरच, अनेक खुलासे समोर येणार आहेत. दरम्यान, या कारवाई दरम्यान मोठा पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आला होता. त्यानुसार, अद्यापही तपास आणि कारवाई सुरुच असल्याचे समजते.




## मीरा-भाईंदरमध्ये मराठीची गळचेपी?
# पोलिसांकडून दबावतंत्राचा आरोप

**■डोंबिवली :** मीरा-भाईंदर परिसरात मराठी भाषेच्या हक्कासाठी आवाज उठवणाऱ्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने व मराठी एकीकरण समितीने प्रशासनावर आणि पोलीस यंत्रणेवर थेट आरोप केले आहेत. या पार्श्वभूमीवर डोंबिवलीत मनसेतर्फे पत्रकार परिषद घेऊन राज्य सरकारवर संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली.

मनसेच्या ठाणे जिल्हाध्यक्ष प्रकाश भोईर यांनी सांगितले की, मीरा-भाईंदरमध्ये मराठी माणसाचा, भाषेचा आणि संस्कृतीचा गळा दाबण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दिल्लीहून आदेश येत असून, हिंदी भाषेला पुढे करण्यासाठी मराठीची पिळवणूक होत आहे. यासंदर्भात मनसे व मराठी एकीकरण समितीने प्रशासनाला नोटीसही पाठवली होती. त्यानंतर पोलिसांनी आंदोलकांवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला असून, यामुळे हे प्रकरण अधिकच तापले आहे.

जिल्हा अध्यक्ष दीपिका पेडणेकर यांनी स्पष्ट इशारा दिला की, जर सरकार मराठी भाषिकांशी आणि मोर्चेकऱ्यांशी असे वागणार असेल, तर मनसे शांत बसणार नाही. वरिष्ठांच्या आदेशानुसार आम्ही मीरा-भाईंदरमध्ये उतरू. या पत्रकार परिषदेस शहर व जिल्ह्यातील अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

> ''राज ठाकरेंनी यावर भाष्य करताना स्पष्ट म्हटले आहे की, 'आमची सत्ता रस्त्यावर आहे. लोकांच्या हक्कासाठी आम्ही लढत राहू.' मीरा-भाईंदरमध्ये सध्या मनसे कार्यकर्त्यांची एक टीम दाखल झाली असून, दुसरी टीमही तयार स्थितीत आहे.''
>
> **-राहुल कामत, शहराध्यक्ष डोंबिवली**

# नाशकात सोशल मीडियावरील आमिषाचा बळी

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रशांत साहेबराव पाटील (वय ४०, रा. तिडके कॉलनी) यांनी ६ जून २०२५ रोजी राहत्या घरात आत्महत्या केली होती. त्यांच्या पत्नीने नाशिक पोलिस आयुक्तालयाच्या सायबर पोलिसांत एक तक्रार अर्ज दिला होता. त्यानुसार डिसेंबर २०२३ ते ६ जून या कालावधीत प्रशांत यांना फेसबुकच्या 'https://www.facebook. com/padma.v.chikte' या लिंकसह padmavchikte@gmail. com हा ई-मेल आणि ९१५६०९७८०५ क्रमांकावरून संपर्क साधण्यात आला.

**■नाशिक :** सोशल मीडियावर अज्ञातांशी ओळख झाल्यानंतर त्यांनी दिलेल्या आमिषाला बळी पडून ऑइलची विक्री करण्याच्या व्यवसायात लाखो रुपयांची गुंतवणूक करून फसलेल्या नाशिकच्या व्यावसायिकाने जून महिन्यात आत्महत्या केल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. या घटनेनंतर आत्महत्या केलेल्या व्यक्तिच्या पत्नीची फिर्याद नोंदवून घेत नाशिक सायबर पोलिसांनी अज्ञातांविरुद्ध फसवणुकीसह आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा नोंदवला आहे. सायबर गुन्हेगारीला त्रासून आता थेट आत्महत्येचे प्रकरण उघड झाल्याने पोलिसांसह समाजासमोरील आव्हान वाढल्याची चिंता व्यक्त होत आहे.

'हापको ऑइल' या व्यवसायात गुंतवणूक केल्यास अधिकचा नफा मिळेल, असे आमिष दाखविण्यात आले. त्यामुळे पाटील यांनी त्यांच्या तीन मित्रांकडून काही पैसे हातउसने घेतले होते. पाटील यांनी संबंधित लिंक व मोबाइल क्रमांकावरून संपर्क साधलेल्या अज्ञात व्यक्तिंना तब्बल ५५ लाख ७९ हजार रुपये ऑनलाइन स्वरुपात दिले होते. त्यांनी संशयितांच्या सांगण्यावरून सदरची रक्कम विविध बँक खात्यांत जमा केली होती. मात्र, बरेच दिवस उलटूनही ऑइलच्या व्यवसायासंदर्भात कोणतीही माहिती मिळाली नाही. यासह त्यांचे पैसेही परत मिळाले नाहीत. त्यामुळे हातउसने घेतलेले पैसे फेडण्यासह इतर आर्थिक संकटे पाटील यांच्यासमोर उभी ठाकली. त्याला त्रासून त्यांनी गत महिन्यात जीवन संपविले.

या प्रकरणी पाटील यांच्या पत्नीला माहिती असल्याने त्यांनी पोलिसांत अर्ज देत तपासाची विनंती केली होती. त्यानुसार सायबर पोलिसांनी याप्रकरणी चौकशी करून अज्ञात सायबर चोरट्यांविरुद्ध पाटील यांच्या पत्नीच्या फियार्दीवरून फसवणुकीसह आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा नोंदवला आहे.




## लाकडाने भरलेली गाडी अडवली, १ लाख मागितले
# एसीबीने सापळा रचला अन् टांगा पलटी घोडे फरार

**■छत्रपती संभाजीनगर :** लाकडाने भरलेले वाहनावर कारवाई न करता ते सोडून देण्यासाठी ४० हजार रुपयांची लाचेची मागणी करणाऱ्या वनपाल मनोज त्रिंबक कुमावत, खासगी व्यक्ती सय्यद इमरोज सय्यद खाजा आणि शेख अब्दुल मुजाहिद शेख कबीर या तिघां विरोधात एमआयडीसी सिडको पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात ४० हजार रुपये स्वीकारताना शेख अब्दुल यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जालना येथील पथकाने (एसीबी) रंगेहात पकडले तर वनपालासह अन्य एक पसार झाले आहेत.




तक्रारदाराचे लाकडाने भरलेले वाहन वनपाल मनोज त्रिंबक कुमावत याने ३ जुलै रोजी रात्री उशीरा पकडून सय्यद इमरोज सय्यद खाजा याच्या मालकीच्या चिकलठाणा एमआयडीसी परिसरातील एस.के. सॉ मिल येथे लावले. गाडीवर कारवाई न करण्यासाठी आणि गाडी सोडून देण्यासाठी वनपाल कुमावत याने 1 लाख रुपयांची मागणी केली. लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदारांनी एसीबीच्या जालना युनिटकडे तक्रार केली. पथकाने १० जुलैली तक्रारीची पडताळणी केली. यात वनपाल मनोज कुमावत याने सदर वाहनावर कारवाई न करता ते सोडून देण्यासाठी १ लाखांची मागणी करुन तडतोडी अंती ४० हजार रुपये स्वीकारण्याची तयारी दर्शवली हे स्पष्ट झालं. तसेच खासगी व्यक्ती सय्यद याने तक्रारदारास लाच देण्यासाठी प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर पथकाने रात्री आठ वाजता सापळा रचला. त्यात वनपाल कुमावत याच्या वतीने खासगी व्यक्ती शेख अब्दुल मुजाहीद शेख कबीर (व्यवस्थापक, एस.के. सॉ मिल) याने 40 हजार रुपये स्वीकारताच त्यास पथकाने पकडले. लाचेच्या रक्कमेसह त्याकडे दोन मोबाइल आढळून आले. तर सापळ्याची चाहूल लागताच वनपाल कुमावत आणि खासगी व्यक्ती सय्यद हे पळून गेले. त्या दोघांचा शोध सुरु आहे.

ही कारवाई एसीबीचे पोलीस अधिक्षक माधुरी कांगणे, प्रभारी अपर पोलीस अधिक्षक सुरेश नाईकनवरे, पोलीस उप अधिक्षक बी. एस. जाधवर, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शरदचंद्र रोडगे, पोलीस कर्मचारी गजानन घायवट, गजानन कांबळे, गजानन खरात, गणेश चेके, शिवलिंग खुळे, भालचंद्र बिनोरकर आदींनी केली.

## गोंदियात मेकअप स्टुडिओच्या नावाखाली वेश्या व्यवसाय, दोघांवर गुन्हा दाखल
# गोंदिया पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**■गोंदिया :** गोंदिया शहरातील जयस्तंभ चौक परिसरात मेकअप स्टुडिओच्या नावावर सुरु असलेल्या वेश्या व्यवसायाचा स्थानिक गुन्हे शाखाच्या पथकाने पदार्फाश केला आहे. पोलिसांनी दोन आरोपींना ताब्यात घेतले आहे. बळीराम बस्ताराम घोटेकर (३५) व दिलीप बस्ताराम घोटेकर (३२) दोघेही राहणार रेलटोली, गोंदिया असे आरोपींचे नाव आहेत.

गोंदिया शहरातील जयस्तंभ चौक परीसरातील बसस्थानकासमोर असलेल्या मॉस मेकअप स्टुडिओ अँड द बॉडीस स्पा सेंटर मध्ये मसाजच्या नावाखाली वेश्या व्यवसाय सुरु असल्याची खात्रीशीर माहिती स्थानिक गुन्हे शाखाच्या अधिकाऱ्यांना मिळाली होती. या आधारे पोलिस अधीक्षक गोरख भामरे यांच्या सूचनेप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक पुरुषोत्तम अहेरकर यांच्या मार्गदर्शनात बेटा बचाव राष्ट्रीय अभियान व नशा हटाव, बेटा बचाव संस्थेचे जिल्हा अध्यक्ष यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सदर स्पा सेंटर परीसरात सापळा रचून छापामार कारवाई केली.

यावेळी पथकाला एका खोलीत ग्राहकासोबत एक महिला दिसून आली. दरम्यान,सेंटरची पाहणी केली असता पहिल्या माळ्यावर पुन्हा ४ महिला मिळून आल्या. यावेळी सदर महिलांनी आरोपी बळीराम घोटेकर व त्याचा भाऊ दिलीप हे दोघेही स्वतःच्या आर्थिक लाभाकरीता त्यांना पैशांचे आमिष देऊन स्पा सेंटर मध्ये वेश्या व्यवसाय करायला लावत असल्याचे सांगितले.




**दोन्ही आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल**

दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखाच्या पथकाने आरोपी बळीराम घोटेकर व त्याचा भाऊ अरोपी दिलीप घोटेकर या दोघांना ताब्यात घेतले. याप्रकरणी दोन्ही आरोपींच्या विरोधात गोंदिया शहर पोलिस ठाण्यात कलम ३,४,५.६ अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियम १९५६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### दोन दिवसांपूर्वीच पुण्यात स्पा सेंटरच्या नावाखाली देह व्यापार सुरु प्रकरणी कारवाई

दोन दिवसापूर्वी पुण्यामध्ये देखील अशीच घटना घडली होती. पुण्यात स्पा सेंटरच्या नावाखाली देह व्यापार सुरू असल्याची धक्कादायक माहिती समोर आली होती.. पुणे पोलिसांनी या प्रकरणी कारवाई करत १८ मुलींची सुटका केली होती. पुण्यातील उच्चभ्रू बाणेर आणि विमानतळ भागात पोलिसांनी छापेमारी केली. या छापेमारीमध्ये १८ मुलींपैकी १० पेक्षा अधिक मुली परदेशी नागरिक असल्याचं समोर आलं आहे. पुण्यात स्पा सेंटरच्या नावाखाली चालणाऱ्या वेश्याव्यवसायावर पोलिसांनी छापेमारी केली. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, परिमंडळ ४ अंतर्गत येणाऱ्या पुण्यातील बाणेर आणि विमानतळ परिसरात स्पा सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या मसाज सेंटरवर पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली आहे.

# आदिवासी आश्रम शाळेतील १३ विद्यार्थीनींना विषबाधा

**■बुलढाणा :** बुलढाणा तालुक्यातील येळगावं येथील पैनगंगा आदिवासी आश्रम शाळेतील १३ विद्यार्थीनींना विषबाधा झाल्याची घटना घडली आहे. यामध्ये पाच विध्यार्थीनी गंभीर असल्याची माहिती मिळत आहे. रात्रीच्या जेवणातील कढी भात खाल्यानंतर विद्यार्थिनींना उलट्या आणि जुलाबाचा त्रास झाला. विद्यार्थिनींवर बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरु आहेत. पैनगंगा आदिवासी आश्रम शाळा ही भाजपा जिल्हाध्यक्ष व माजी आमदार विजयराज शिंदे यांची आहे.

बुलढाणा तालुक्यातील येळगाव येथील पैनगंगा आदिवासी आश्रम शाळेतील १३ विद्यार्थिनींना काल रात्री कडी आणि भात खाल्ल्याने विषबाधा झाली. अचानक मुलींना उलट्या व जुलाबाचा त्रास सुरु झाल्याने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. यातील पाच विद्यार्थिनींची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. पैनगंगा आदिवासी आश्रम शाळा ही बुलढाण्याचे माजी आमदार व सध्याचे भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांची आहे.




रात्रीच्या जेवणातील कढी भात खाल्यानंतर विद्यार्थिनींना उलट्या आणि जुलाबाचा त्रास

दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, रात्रीच्या जेवणातील कढी भात खाल्यानंतर विद्यार्थिनींना उलट्या आणि जुलाबाचा त्रास झाला जाणवू लागला होता. त्यानंतर तात्काळ विद्यार्थिनींना बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यांच्यावर उपचार सुरु करण्यात आले आहेत. दरम्यान, यामधील पाच विद्यार्थिनींची प्रकृती खालावल्याची माहिती मिळत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधीन राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by Dr. Mr. Deepak Moreshwar Naik. Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com